# आजचे राजकारण आणि एन. डी. पाटील यांच्या विचार आणि कार्याची प्रस्तुतता

**श्री. लोंढे अभिजित शंकरराव**, कॉलेज संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
**डॉ. व्ही. जी. कोरे** कॉलेज संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

---

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र हे सामाजिक व राजकीय दृष्ट्या प्रगतीपथावर असलेले पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक थोर विचारवंत समाजसुधारक होऊन गेले. त्यांनी विविध सामाजिक चळवळीद्वारे सामाजिक समतेचा, सामाजिक न्यायाचा संदेश देऊन समाज जागृती व परिवर्तनात मोलाचा हातभार लावला. शेतकरी कामगार पक्षाच्या कामशिवाय महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय इतिहासाची वाटचाल आपल्याला मांडता येणार नाही. महाराष्ट्राच्या जडणघडणीत शेतकरी कामगार पक्षाने निश्चित अशी भूमिका बजावलेली आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाने आणि राज्यघटनेने स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही ही मूल्ये रुजवली. या संकल्पनावर पूर्ण निष्ठा ठेऊन तो विचार समाजात रुजवण्यासाठी आयुष्य करणी लावायच्या दृष्टीने एन. डी. कार्यरत होते.

प्रा. डॉ. नारायण ज्ञानदेव पाटील उर्फ एन. डी. पाटील यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी एक अशिक्षित शेतकरी कुटुंबात ‘ढवळी’ ता. वाळवा जि. सांगली या गावी झाला. एन. डी. पाटील यांचे शालेय शिक्षण ढवळीत, चौथी ते सातवी पर्यंत शिक्षण बागणी येथे पूर्ण केले. बागवी येथे त्यांना शिकवणारे माळे गुरुजी ही सत्यशोधक चळवळीचे प्रभाव असलेले व सुधारणावादी विचाराचे होते. त्यामुळे तिथे एन. डी. वर सत्यशोधक विचारांचे बीजारोपण झाले. सातवी नंतरचे हायस्कूल शिक्षण आष्ट्याला झाले. तेथील मुख्याध्यापक खैरमोडे सरांनी पुस्तकी शिक्षणबरोबरच सत्यशोधकी विचार, जातिभेद निर्मूलन व सामाजिक समता या विचारांचे संस्कार विद्यार्थ्यांवर केले व त्यातूनच त्यांचे भावी आयुष्य घडत गेले. १९४८ ला एन. डी. मॅट्रिक पास झाले. त्यांनतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात घेतले. त्याकाळात त्यांनी अभ्यासबरोबरच विद्यार्थी चळवळीत स्वतःला झोकून दिले. त्याकाळी कोल्हापूर हे सामाजिक-राजकीय चळवळीचे केंद्र बनले होते. राष्ट्र सेवा दल, सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेतर चळवळ, शेतकरी कामगार पक्ष तसेच महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या विचारांचा प्रभाव प्रा.डॉ. एन. डी. पाटील यांच्यावर होता. त्यामुळे समाजातील गरीब कष्टकरी, अन्याय झालेल्या लोकांसाठी त्यांनी नेहमीच लढा उभा केलेला दिसून येतो. याच दरम्यान एन. डी. पाटील यांनी शोषणमुक्त आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीचे ध्येय असलेल्या, बहुजन हिताचा विचार शेतकरी कामगार पक्षांच्या माध्यमातून स्वीकारण्याचे ठरवले.

इ. स. १९४८ साली स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या सुरुवातीपासूनच म्हणजे विद्यार्थीदशेतपासून एन. डी. नी शेतकरी कामगार पक्षाच्या चळवळीमध्ये सहभाग घेतला. यातूनच एन. डी. पाटलांचे राजकीय व्यक्तिमत्व उदयास आले. शेतकरी पक्षाच्या स्थापनेपासून श्वासच्या अखेरपर्यंत जवळपास ७० वर्ष एन. डी. पाटील शेतकरी कामगार पक्षात राहूनच समाजकार्य करीत राहिले. त्यांनी कधी पक्षाबाबत धारसोड केली नाही किंवा स्वार्थासाठी पक्ष बदलला नाही. त्यांनी सत्तेचे राजकारण कधी केले नाही. अनेक निवडणुका लढविल्या, पण हार-जीत महत्त्वाची मानली नाही. लोकशाहीत राजकारण अधिकाधिक मूल्याधिष्ठ व्हावे, यासाठी निवडणुका हादेखील आंदोलनाचाच एक भाग आहे, अशी मांडणी ते करीत. विचाराची बैठक स्पष्ट होती. सत्ता हे सध्या नसून समाज परिवर्तनाचे साधन आहे, या तत्वशी प्रामाणिक राहून त्यांनी कार्य केले. त्यांनी जीवनात राजकारणापेक्षा समाजकारणालाच अधिक महत्व दिले. सत्ता मिळवण्यासाठी त्यांनी राजकारण केले नाही तर लोककल्याण, जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी राजकारणाचा उपयोग करून घेतला व त्यातून लोकहिताची जोपासना केली.

प्रा. एन. डी. पाटील महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये १८ वर्षे व विधानसभेमध्ये ५ वर्षे सदस्य होते. आपल्या प्रभावी मांडणीने प्रा. एन. डी. पाटील यांनी सरकारला अनेक जनहिताचे निर्णय घ्यावयास भाग पाडले.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुलोद मंत्रिमंडळात ते सहकार खात्याचे मंत्री होते. त्यांच्या पुढाकारानेच विदर्भ-मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कापूस एकाधिकार योजना लागू केली गेली. रयत शिक्षण संस्थेचे १९६० पासून मॅनेजिंग कौन्सिल मेंबर व १८ वर्षेचेअरमन होते; परंतु संस्थेकडून एक रुपयासुद्धा त्यांनी मानधन घेतले नाही, स्वातंत्र्यसैनिकाची पेन्शन घेतली नाही, सार्वजनिक जीवनात जनतेच्या एका पैलाही हात लावला नाही, आमदार म्हणून मिळणारी सदनिका घेतली नाही. महाराष्ट्रातील चरित्रसंपन्न, नैतिक अधिष्ठान असलेल्या नेत्यांची यादी केली तर एन डी पाटील यांचा नाव पहिल्यांदा घ्यावे लागेल. महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय चळवळींचा इतिहास लिहियाचा झाला तर एन. डी. पाटील यांचे नाव आणि त्यांनी केलेले काम याची दखल घेतल्याशिवाय तो पूर्ण होऊ शकत नाही. गेल्या ५५-६० वर्षात एन. डी पाटील यांनी केलेले लढे, संघर्ष , मांडलेली विधायक भूमिका हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनून राहील आहे. आयुष्याभर एन. डी. नी शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी यांच्यासाठी केलेले कार्य मौलिक आहे. एन. डी. पाटील यांनी केलेले समाजकारण व राजकारण महाराष्ट्राच्या पुरोगामी विकासाला महत्वपूर्ण आहे.

**विषय विवेचन:**

लोकाग्रहासाठी, लोकलाजेसाठी आणि लोकानुनयासाठी तत्त्वनिष्ठेची तिलांजली देणे एन. डी.च्या तत्त्वात बसत नव्हते. तत्त्वनिष्ठेपायी रोष पत्करण्याचीही त्यांची तयारी असते. १९८५ साली कोल्हापूर मतदार संघातून त्यांची विधानसभेवर निवड झालेली होती. आमदार म्हणून त्यांची विजयी मिरवणूक कोल्हापूर शहरातून चालू होती. तो दिवस होळीचा होता. एका चौकात गर्दी होती, त्या चौकाच्या मध्यभागी त्यांच्या विजयासाठी जिवाचे रान करणाऱ्या कार्यकर्त्यांनी होळी रचली होती. उत्साही कार्यकर्त्यांची मागणी होती की त्यांनी आपल्या शुभहस्ते होळी पेटवावी. ही विनंती त्यांनी नाकारली. काही कार्यकर्ते नाराज, काही संतप्त झाले, या वातावरणात एन.डी.पाटील मोटारीतून खाली उतरले. त्यांनी जनसमुदायाला सांगितले; मी होळी पेटवणार नाही कारण ही गोष्ट माझ्या बुद्धीला पटत नाही, माझ्या तत्त्वात बसत नाही, आणि जे मला पटत नाही ते मी करणार नाही. यामुळे माझे कार्यकर्ते म्हणून आपण नाराज असाल तर मी तुमच्यावतीने पहिली घोषणा देतो, 'एन्.डी.पाटील मुर्दाबाद!' आणि या घोषणा पुढे देत तुम्ही माझा निषेध करू शकता. पण मी होळी पेटवणार नाही. खरे तर राजकीय नेत्यांनी समाजाला मार्ग दाखवण्याचे काम केले पाहिजे, तेथे सध्याचे राजकारण पाहता नेतेलोक लोकानुनयाच्या मागे जाताना दिसतात. तिथे एन. डी.च्या विचारांची प्रस्तुतात आहे. जो विचार मला मान्य नाही तो विचार सार्वजनिक जीवनात मतं मिळवण्यासाठी सुद्धा अमलात आणणार नाही. अशा प्रकारची ठोस, स्पष्ट भूमिका एन. डी. नी घेतली. मतांसाठी सत्तेसाठी लोकांमयवादी होणार नाही, सत्तेसाठी माझ्या विचारात बदल करणार नाही. इतका तत्वनिष्टता, मूल्यनिष्टता जोपर्यंत उभी राहणार नाही तोपर्यंत आज ज्या प्रकारचा बहूसंख्यांक प्रवाह या देशामध्ये बळकट होतो आहे, विस्तारतो आहे त्याला तोड देता येणार नाही. धर्म ही व्यक्तिगत आणि उंबरठ्याचा आत मानावयाची गोष्ट आहे. परंतु सध्याच्या राजकारणामध्ये धर्म हा व्यक्तिगत गोष्ट न राहत ते एकागट्टा मत मिळवण्याचे किंवा मताचे राजकारण झाले आहे . येथे एन. डी. पाटील म्हणतात की, धर्मनिरपेक्ष राष्ट्रच शेवटच्या दीनदुबळया माणसाच्या हिताचा विचार करू शकेल. धर्माचा आधार राष्ट्र एकत्र बांधू शकत नाही. धर्माच्या आधारावर पाकिस्तान आणि बांगला देश एकत्र नांदू शकले नाहीत. धर्म, रोजीरोटी, निवास, शिक्षण, आरोग्य देऊ शकत नाही. जातिपंथ-धर्म निरपेक्ष राष्ट्र हीच प्रगत राष्ट्राची मानवतावादी संकल्पना असू शकते. आजचे राजकीय नेते सामाजिक सुधारणेच्या चळवळीपासून फटकून वागतात. सत्ताकारण हेच त्यांना महत्वाचे वाटते. त्याला एन. डी. अपवाद होते. आजच्या राजकारणामध्ये अशा प्रकारचा विचार करणारे समाजाला, राष्ट्राला दिशा देणार नेतृत्व खूप कमी दिसते . तिथे एन. डी. पाटील प्रस्तुत आहेत.

एन. डी. नी अनेक चळवळी केल्या, अनेक लढे उभे केले. ज्याला स्वत:च्या हक्काची जाणीव नाही, ज्याला स्वत:च हित कशात आहे हे समाजत नाही, ज्याला जगायच कस याची चिंता आहे अशा लोकांना घेऊन एन. डी. नी चळवळी उभ्या केल्या, त्यांच्यात चळवळीचे स्फुल्लिंग चेतवत आणि लढा लॉजिकल एंडला घेऊन जात. आजच्या नवउदार काळात आंदोलने निदर्शने हे जनतेच्या हितपेक्षा स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी केले जातात आणि एका मर्यादेनंतर एक तर ते मॅनेज केले जातात किंवा होतात, किंवा माघार गेतेले जातात. त्या आजच्या

काळात एन. डी. प्रस्तुत आहेत. त्यांनी आंदोलनात केलेल्या त्यागाच, कष्टाचा कधीच गाजावाजा केला नाही. याउलट आमदार म्हणून मिळणारे वेतन, निवृत्तीवेतन लोकांसाठी, चळवळीसाठी खर्ची केले याचाही गाजावाजा त्यांनी कधी केला नाही. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या 50-60 वर्षांच्या काळात जे जे शेतकरी, कष्टकरी, आदिवासी किंवा अन्याय झालेल्या घटकांची प्रश्न असतील तिथे एन. डी. नी चळवळी, आंदोलने उभी केली. मग ते वीज दरवाढविरोधी आंदोलने असो, धरणग्रस्तांचं आंदोलन असो, भूमिहीनांसाठी भूमी आंदोलन असो, प्रकल्पग्रस्तांचं असो, 'सेझ'चं असो, 'एन्रॉन'ला विरोध करणाऱ्यांचं असो, 'झिरपा करा' विरोधातलं असो, उसाच्या बिलातून अवाजवी कपाती करणाऱ्या साखरसम्राटांविरोधातलं असो, आदिवासींच्या जमिनींच्या हक्कांचे असो, कोल्हापुरातील टोलविरोधी आंदोलन ही सर्व आंदोलने एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाली. एन. डी.चं आंदोलन कशासाठी, याचं भान पक्कं होतं. आधी ते सर्वंकष माहिती घ्यायचे, त्यावर मत बनवायचे. एकदा ते मत तयार झालं, की त्यावर ते ठाम राहायचे. आंदोलन 'सेझ'विरोधातलं असो की कोल्हापूरच्या टोलविरोधातलं; दबाव आणि आमिषं या दोन्हींना एन. डी. कधी बळी पडले नाहीत. एन. डी. आंदोलनात आहेत म्हणजे ते आंदोलन 'मॅनेज' होणार नाही, याची खात्री आंदोलकांना असायची, सरकार दरबारातल्या सगळ्यांना असायची आणि ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत, अशा भांडवलशहांनाही असायची. त्यामुळं एन. डीं.नी अभ्यासपूर्वक आंदोलन हाती घेतलं, म्हणजे त्याची तड लागेपर्यंत ते थांबत नाहीत, याची निश्चिती असायची. असं आवाज नसलेल्यांना 'आवाज' द्यायच काम, ज्यातून कसलाही मोबदला मिळायची शक्यता नाही; अगदी मतं मिळायचीही खात्री नाही, ते काम एन. डी. हयातभर निष्ठेन करत राहिले.

एन. डी. पाटील हे १९८५ ते १९९० काळामध्ये कोल्हापूरचे आमदार होते. त्याकाळात त्यांनी अनेक लोककल्याणाची, विकास कामे केली. मी कामे केली म्हणून मला मते द्या असे ते कधी म्हटले नाहीत कारण विकास कामे करणे हे लोकप्रतिनिधीच कामच आहे असे ते म्हणत. मला मतं मी मांडतो त्या विचारांसाठी द्या, मी जी विकासाची भूमिका मांडतोय की हा देश कोणत्या दिशेने जावा, ह्या देशाची प्रगती कोणत्या दिशेने व्हावी आणि मी जी भूमिका मांडतोय त्या भूमिकेला मतं द्या. अशा प्रकारचा विचार ते सातत्याने मांडत होते. त्यामुळे त्यांचे ते वेगळेपण कायम प्रस्तुत आहे. राजकारण हे फक्त सत्तेसाठी नसते, त्यासाठी व्यापक बदलाची लढाई म्हणून राजकारणाकडे बघायचे असते. ते भान सुटले की काय होते ते आजचे राजकारण ज्या दिशेने चालले आहे ते होते.

एन. डी. पाटलांचा आणखीन एक गुण तो म्हणजे विचारनिष्ठेचा; ज्यातून त्यांचं राजकारण आकाराला आलं. जे सत्तेची पदं किती मिळाली या अंगानं केला तर एन. डी. च राजकारण हे मागं पडलेलं, पराभूत राजकारण वाटेल; पण त्याच्या बुडाशी असेलली विचारनिष्ठा आज देश ज्या वळणावर उभा आहे, तिथं नुसतं प्रस्तुतच नाही तर अत्यावश्यकही आहे. एन. डी. पाटील यांनी राजकारणात यश मिळालं की नाही, याचा विचार न करता ज्या मूल्यांशी आपली बांधिलकी आहे, त्याच्याशी तडजोड नाही, अशी ठाम ठोस भूमिका आयुष्यभर निभावली. एन. डी. म्हणत, "आम्ही राजकीय तळ गमावले; मात्र वैचारिक तळ शाबूत आहेत. तेही गमावले तर संपूनच जाऊ. वैचारिक तळ राखले तर उद्या राजकीय तळही परत मिळवू." हीच बहुसंख्याकवादाविरोधातल्या लढाईची व्यूहनीती असली पाहिजे. ही लढाई नेमकी काय, हे समजावून घेतलं तर एन. डी.च्या कामाची प्रस्तुतता आपोआपच अधोरेखित होते. जागतिकीकरण उदरीकरणा या देशातील राजकारण बदलले. जागतिकीकरण उदरीकरणामुळे विशिष्ट प्रकारची प्रगती या देशामध्ये महाराष्ट्रामध्ये झाली. त्यातून राजकारणाचा पोत बदलला आणि तो पोत बदलत असताना डावे हळूहळू बाजूला पडायला लागले. स्वातंत्र्यानंतर देश डावे ते मध्यम घडत गेला परंतु ९० च्या दशकात याला छेद बसला. भांडवलशाहीने केलेल्या देशाचा विकास आणि उदारमतवादी लोकशाही यातील त्रुटी यातून तयार झालेला राजकीय बहुजनवाद, धर्मवाद या देशात वाढला. उदरीकरणामुळे या देशात जो मध्यम वर्ग तयार झाला तो कळत नकळत बहुजन वादाच्या राज्यकरणकडे वाळाला. या देशामध्ये सर्वसमावेशक, धर्मनिरेपेक्ष राजकारण अपेक्षित आहे. हा विचार मान्य नसणारे स्वातंत्राच्या आधी अल्पमतात होते परंतु त्यांनी आपला विचार चिकाटीने लावून धरला. हळूहळू एक एक पाऊल टाकत ९० च्या दशकापर्यंत टिकून राहिले आणि ९० च्या दशकात बळ मिळण्यास सुरुवात झाली. आता ते या देशातील सत्ताधारी झाले आहेत. याचे कारण काय तर

चिवटपणे ज्या विचारला सहजासहजी मान्यता मिळत नव्हती तो विचार त्यांनी लावून धरला त्यामुळे एन. डी. चे राजकारण सत्तेच्या हिशोबत यशस्वी का अयशस्वी न बघता ते सांगतात त्याप्रमाणे वैचारिक तळ धरून ठेवले पाहिजे . ते तळ जर धरून ठेवले तर आज ना उदय आज जो बलदंड प्रवाह दिसतो आहे त्याच्या विरोधात उभे राहण्याची ताकद मिळेल आणि कदाचित तो प्रवाह उलटून टाकता येईल.

शिक्षण हे राष्ट्राने करावयाचे धर्मादाय काम नसून राष्ट्राच्या भविष्यकालीन विम्यासाठी केली जाणारी ती एक फलदायी गुंतवणूक आहे, ही एन. डी. सरांची शिक्षणविषयक धारणा आहे. एन. डी. पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग काऊंसिलचे सदस्य झाले. १९९० ते २००८ असे १८ वर्ष चेअरमन होते. त्या काळात ते व्यावसायिक महाविद्यालयांच्या विरोधात उभे राहिले उदा. मेडिकल कॉलेज. या उलट ते आदिवासी भागात आणि ग्रामीण भागात शाळा उभ्या करण्यात जाणीवपूर्वक प्रयत्न केले. आजचे शिक्षण सम्राट किंवा नेते मंडळी हे व्यावसायिक महाविद्यालये उभा करण्याकडे कल दिसून येतो. त्याचप्रमाणे त्यांच्या चेअरमन पदाच्या काळामध्ये गुणवत्तेनुसार नवनव्या सेवकांची भारती झाली. त्यात त्यांनी भ्रष्टाचार व वशिलेबाजी होऊ नये म्हणून काळजी घेतली व नेमणूक ह्या मेरीटनुसार केल्या. आजच्या काळामध्ये ही गोष्ट स्वप्नावत वाटावी अशीच आहे. तिथे व्यापक समाजहिताचा विचार करता एन. डी. चे विचार प्रस्तुत होताना दिसतात.

**निष्कर्ष:**

एकंदरीतच प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या विचारधारेशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले आणि समाजातील कष्टकरी, गरीब, शेतकरी , शेतमजूर, अन्याय झालेल्या लोकांच्या बाजूने नेहमी उभे राहून प्रस्थापिताविरूध्द लढा दिला. त्यांनी कधीही त्यांच्या वैचारिक, विज्ञानवादी, पुरोगामी, बहुजनवादी विचारांशी प्रेरतारणा केली नाही. त्यांनी या तत्वासाठी कधीही तडजोड केली नाही किंवा सत्तेसाठी माघार घेतली दिसून नाही. त्यांनी राजकारणापेक्षा समजकरणावर अधिक भर दिलेला दिसून येतो. सध्यकालीन राजकीय परिस्थिती पाहता राजकीय मूल्यांची झालेली घसरण, पक्षनिष्ठेचा अभाव व सोईचा पक्षबदलूपणा, तत्व शून्य राजकारण, नेत्यामधील अभ्यासाचा अभाव जो जाणवतो, त्या पार्श्वभूमीवर एन. डी. पाटील यांनी जपलेली नीतीमूल्ये व त्यानुसार केलेले आचरण हा त्यांचा कृतीशील वैचारीक वारसा सध्यकालीन पिढीला दिशादर्शक ठरणारा आहे.

**संदर्भ सूची :**

1) पाटील विजया , संकलन: डॉ. एन. डी. पाटील, मुक्ता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २०१४ .

2) पाटील एन. डी., माझी संघर्षयात्रा ( स्वकथन ), विजिगीषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती,२०२० .

3) बेडकिहाळ किशोर व सी. व्ही. पाटील, प्रा. एन. डी. पाटील व्यक्तित्व आणि कर्तृत्व, आंबेडकर अकादमी, सातारा, प्रथम आवृत्ती , २००५ .

4) भोळे भा. ल. व बेडकिहाळ किशोर, बदलता महराष्ट्र ( साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा ), आंबेडकर अकादमी, सातारा, प्रथम आवृत्ती, २००३ .

5) पाटील टी. एस. व कुलकर्णी प्रसाद, बुलंद कर्मयोगी , प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २०२२ .

6) खोत एस. के., महाराष्ट्राचे सन्मानबिंदू, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २०११ .

दैनिके :

१) दै. पुण्यनगरी

२) दै. महाराष्ट्र टाईम्स

३) दै.पुढारी

४) दै. सकाळ

५) दै.लोकमत

नियतकालिके / मासिके :

१) साधना ( साप्ताहिक )

२) अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र